**Schedule**

| Sr. No. | Development Plan Village, Taluka, District | Reservation in the said Development Plan and its approximate area as per D. P. Report | Description of the Land | Area deleted from the reservation |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 Sq. mtrs. |
| 1 | D.P. Vita (2nd R) Village Vita, Taluka Khanapur, District Sangli. | Site No. 117, "High School.", Area 1.50 Ha. | S. No. 899/1, (New S. No. 509/1) (Part). | 1.50 |

**Note.–**

1. The said land so released from the said reservation shall become available to the said land owner for the purpose of development as otherwise permissible in the case of adjacent land under the said Development Plan.

2. A copy of the part Plan of the said Development Plan showing the aforesaid Modification will be made available for inspection in the office of Municipal Council, Vita during office hours on all working days.

3. This order will also be published on the Directorate's Official website *www.dtp.maharashtra.gov.in*.

**SUDHAKAR NANGNURE,**
Director of Town Planning,
Maharashtra State, Pune.

Pune, 28th June 2021.

---

## जिल्हाधिकारी यांजकडून

**जिल्हा पुणे**

*महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम १२६, पोट-कलम (४) सह भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ च्या कलम १९ ची घोषणा.*

### *अधिसूचना*

क्रमांक पीएलवी-२/कावि-३९/२०२१.-- ज्याअर्थी, पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेची मंजूर विकास योजना (यात यापुढे "उक्त मंजूर विकास योजना" म्हणून संबोधलेली) महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभागाने, अधिसूचना क्रमांक १८०८/८९४/सीआर-१७२७/०९/नवि-१३, दिनांक १८ ऑगस्ट २००९ अन्वये महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ (यापुढे "उक्त महाराष्ट्र अधिनियम, १९६६" म्हणून संबोधिलेला) च्या कलम ३१, पोट-कलम *(१)* अन्वये मंजूर झाली आहे, तसेच पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या वाढीव क्षेत्राची विकास योजनेची अधिसूचना क्रमांक टीपीएस-१८१२/१६०/सीआर ५८/१२, पुनर्बांधणी नं. २७/१२/ईपी मंजूर/यूडी-१३, दिनांक २ मार्च २०१५ अन्वये मंजूर झाली आहे ;

आणि ज्याअर्थी, सोबतच्या अनुसूची-एकमध्ये नमूद केलेल्या जमिनी (यापुढे "उक्त जमिनी" म्हणून संबोधिलेल्या) उक्त सोबच्या अनुसूची-दोनमध्ये नमूद केलेल्या उक्त मंजूर विकास योजनेतील मौजे बोपखेल, तालुका हवेली, जिल्हा पुणे येथील सर्व्हे नंबर १५६ पै. मधील १८ मीटर रुंद रस्ता या सार्वजनिक प्रयोजनासाठी आरक्षित आहेत (यापुढे "उक्त सार्वजनिक प्रयोजन" म्हणून संबोधिलेल्या) ;

आणि ज्याअर्थी, पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने (यापुढे "उक्त महानगरपालिका" म्हणून संबोधिलेली) उक्त महाराष्ट्र अधिनियम, १९६६ च्या कलम १२६, पोट-कलम *(१)* अन्वये उक्त जमिनी उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी संपादन करण्याबाबत जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे पत्र क्रमांक नरवि/कावि/बोपखेल/१७८/१७, दिनांक ७ डिसेंबर २०१७ अन्वये अर्ज केलेला आहे ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास व सार्वजनिक आरोग्य विभागाने, उक्त महाराष्ट्र अधिनियम, १९६६ च्या कलम १५१, पोट-कलम *(१)* खाली काढलेली अधिसूचना क्रमांक टीपीएस-२१७५/५१०६/नवि-७, दिनांक ३ मार्च १९७९ अन्वये, उक्त मंजूर विकास योजनेतील सार्वजनिक प्रयोजनासाठी विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या जमिनींच्या संपादनाबाबतच्या उक्त महाराष्ट्र अधिनियम, १९६६ च्या कलम १२६, पोट-कलम *(१), (२)* व *(४)* खालील राज्य शासनाने वापरावयाच्या शक्ती त्या-त्या जिल्हाधिकाऱ्यांना प्रदान करण्यात आलेल्या आहेत ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाचा, सन २०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४२ अन्वये उक्त महाराष्ट्र अधिनियम, १९६६ अंतर्गत विकास योजनेतील आरक्षित जमिनींचे संपादन करताना भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (यापुढे "उक्त भूसंपादन अधिनियम २०१३" म्हणून संबोधलेला) मधील कलम ४ ते १५ या कलमांना सूट देण्यात आली आहे व सदरचा अध्यादेश महाराष्ट्र शासन राजपत्रात दिनांक ३१ डिसेंबर २०१५ रोजी प्रसिद्ध झालेला आहे.

तसेच आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभागाचा शासन निर्णय क्रमांक टीपीएस-१८१९/१७९६/प्र. क्र. २९८/१८/नवि-१३, दिनांक ८ मार्च २०१९ अन्वये "उक्त महाराष्ट्र अधिनियम, १९६६ मधील तरतुदीनुसार सुरू करण्यात आलेल्या भूसंपादन प्रकरणांमध्ये उक्त महाराष्ट्र अधिनियम, १९६६ च्या कलम १२५ ते १२६ मधील तरतूद विचारात घेता उक्त भूसंपादन अधिनियम, २०१३ चे कलम ११ *(१)*, कलम १६ ते १८ यासोबतच परिशिष्ट २ व ३ तसेच या अनुषंगिक कलमे लागू होणार नाहीत, अशा सूचना दिल्या आहेत आणि म्हणून यासोबतच्या अनुसूची-तीनमधील पुनर्वसाहत क्षेत्राचे वर्णन व अनुसूची-चारमधील पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश निरंक आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त जमिनींच्या संपादनापोटी द्यावयाच्या उक्त भूसंपादन अधिनियमानुसारची नुकसानभरपाईची रक्कम व तदनुषंगिक भूसंपादनाच्या खर्चाची रक्कम संपूर्णपणे उक्त महानगरपालिकेने अदा करावयाची आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त महाराष्ट्र अधिनियमाच्या कलम १२६, पोट-कलम *(२)* मध्ये विनिर्दिष्ट केलेली कालमर्यादा उलटून गेलेली आहे ;

आणि ज्याअर्थी, यासोबत जोडलेल्या अनुसूची-एकमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या जमिनींची अनुसूची-दोनमध्ये अधिक तपशीलवार विनिर्दिष्ट केलेल्या उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यक असल्याबाबत जिल्हाधिकारी, पुणे यांची खात्री झाली आहे.

त्याअर्थी, राज्य शासनाने प्रदत्त केलेल्या शक्तीनुसार आणि महाराष्ट्र अधिनियम, १९६६ चे कलम १२६, पोट-कलम *(४)* सह भूमी संपादन, अधिनियम, २०१३ चे कलम १९ च्या पोट-कलम *(१)* च्या तरतुदींन्वये यासोबत जोडलेल्या अनुसूची-एकमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या जमिनींची अनुसूची-दोनमध्ये नमूद सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे, असे याद्वारे घोषित करण्यात येत आहे ;

आणि त्याअर्थी, उक्त भूमी संपादन अधिनियम, २०१३ च्या कलम ३ च्या खंड *(छ)* अन्वये, समुचित शासन असलेले जिल्हाधिकारी, उक्त भूमी संपादन अधिनियम, २०१३ अन्वये जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी भूमी संपादन विशेष अधिकारी, विशेष घटक क्रमांक २, पिंपरी, पुणे-४११०१८ यांस पदनिर्देशित करीत आहे.

## अनुसूची-एक

### संपादन करावयाच्या जमिनींचे वर्णन

### जिल्हा पुणे, तालुका हवेली, गाव मौजे वोपखेल

| अ. क्र. | सर्व्हे नंबर | संयुक्त मोजणी नकाशा व क्षेत्र विवरणपत्रानुसार भूसंपादनाखालील क्षेत्र | टी.डी.आर./ एफ.एस.आय./ खाजगी तडजोडीद्वारे पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने यापूर्वीच परस्पर ताब्यात घेतलेले क्षेत्र | भूसंपादनाखालील निव्वळ क्षेत्र | चतु:सीमा |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| | | चौ. मी. | चौ. मी. | चौ. मी. | |
| १ | १५६ पैं. | ३६०० | ४४६.३६ | ३१५३.६४ | पूर्व : सर्व्हे नंबर १५६ पैं. उर्वरित भाग.<br>पश्चिम : संरक्षण विभाग सीमाभिंत<br>दक्षिण : सर्व्हे नंबर १५६ पैं. उर्वरित भाग.<br>उत्तर : सर्व्हे नंबर १५६ पैं. उर्वरित भाग. |

## अनुसूची-दोन

### सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण

प्रकल्पाचे नाव : मौजे बोपखेल, तालुका हवेली, जिल्हा पुणे येथील सर्व्हे नंबर १५६ पै. मधील पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेतील १८ मीटर रुंद रस्ता.

प्रकल्प कामाचे वर्णन : १८.०० मीटर रस्ता रुंदीकरण.

समाजाला होणारे लाभ : पायाभूत सुविधा, रोयी-सुविधा, (आर्थिक, रोजगार, पायाभूत सुविधा, रोयी-सुविधा याबाबत व इतर लाभांसंबंधात).

प्रकल्पाखालील जागेची सद्य:स्थिती : पत्राशेड व एक बांधकाम आहे. उर्वरित जागा मोकळी आहे.

## अनुसूची-तीन

### पुनर्वसाहत क्षेत्राचे वर्णन

### जिल्हा पुणे, तालुका हवेली, गाव मौजे बोपखेल

| अनु. क्रमांक | सर्व्हे क्रमांक | अंदाजित क्षेत्र (हेक्टरमध्ये) |
|---|---|---|
| १ | २ | ३ |

पुनर्वसाहत क्षेत्राचे वर्णन निरंक असे

महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभागाने जा. क्र. टीपीएस-१८१९/१७९६/प्र. क्र. २९८/१८/नवि-१३, दिनांक ८ मार्च २०१९ अन्वये "उक्त महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या अधिनियमामधील तरतुदीनुसार सुरू करण्यात आलेल्या भूसंपादन प्रकरणांमध्ये उक्त अधिनियमातील कलम १२५ ते १२६ मधील तरतूद विचारात घेता नवीन भूसंपादन कायद्यातील कलम ११ *(१)*, कलम १६ ते १८ यासोबतच परिशिष्ट २ व ३ तसेच यानुषंगिक कलमे लागू होणार नाहीत" अशा सूचना दिल्या आहेत ;

## अनुसूची - चार

### (पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश)

पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश निरंक असे

**टीप :** उक्त अनुसूचीत नमूद जमिनीचे नकाशे, भूमी संपादन विशेष अधिकारी, विशेष घटक क्रमांक २, पिंपरी, पुणे-४११०१८ व पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, संत तुकारामनगर, श्री शिवछत्रपती शिवाजी महाराज, गोल मंडई इमारत, दुसरा मजला, पिंपरी, पुणे-४११ ०१८ यांच्या कार्यालयात कार्यालयीन वेळात पाहण्याकरिता उपलब्ध आहेत.

पुणे, २ जुलै २०२१.

सत्य प्रत

Kulkarni

भूमि संपादन विशेष अधिकारी

विशेष घटक क्र २. पिंपरी. पुणे - १८

**डॉ. राजेश देशमुख,**

जिल्हाधिकारी, पुणे.

**महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ (४) सह भूमि संपादन पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ चे कलम २१ पोट कलम १ व २ अन्वये जाहीर करावयाचे प्रकटपत्र**

याव्दारे जाहीररीत्या जाणीव करुन देण्यात येते की, मौजे बोपखेल, ता. हवेली, जि. पुणे. गावात किंवा गावानजीक असलेली खाली नमूद केल्याप्रमाणे चतुःसिमा असलेली आणि अलीकडेच हद्दी वगैरे दर्शविलेली व मोजण्यात आलेली खालील अनूसुची - एक मध्ये नमूद केल्याप्रमाणे किंवा त्याहून अधिक किंवा कमी जमीन, तिच्यावर कोणत्याही इमारती बांधलेल्या असल्यास त्यासुध्दा जुलै ८-१४, २०२१ रोजीच्या महाराष्ट्र शासन राजपत्र भाग-1, पुणे विभाग पुरवणीतील पृष्ठ क्रमांक ४ ते ६ वर प्रसिध्द झालेली मा. जिल्हाधिकारी, पुणे यांची महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम १२६ पोटकलम (४) सह भूमि संपादन पुर्नवसन व पुर्नस्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ च्या कलम १९ अन्वयेची अधिसुचना क्र. पीएलबी-२/कावि-३९/२०२१, दि.०२ जुलै २०२१ यास अनुसरुन, सन २०१३ चा भूमि संपादन अधिनियम, क्रमांक ३० अन्वये महाराष्ट्र शासन, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेतील मौजे बोपखेल, ता. हवेली, जि. पुणे येथील सर्व्हे नं. १५६ पै. या मिळकती मधील १८ मी. रुंद रस्ता या सार्वजनिक प्रयोजनासाठी ताब्यात घेण्यात येणार आहे.

ह्या जमिनीत जर तुमचा कोणताही हक्क असेल किंवा तसा हितसंबंध असेल किंवा तीवर तुमचे कोणतेही हक्क असतील किंवा तसा हितसंबंध असणा-या व्यक्तीसाठी काम चालविण्याचा तुम्हांस हक्क असेल तर तुम्हांस याव्दारे फर्मविण्यात येत आहे की, तुम्ही संत तुकारामनगर, गोल मंडई इमारत दुसरा मजला, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे खाली सही करणार यांच्या कार्यालयात उक्त कलम २१ पोटकलम १ व २ अन्वयेच्या जाहीर नोटीशीच्या प्रकाशनाच्या तारखेपासुन ३० दिवसांनंतर आणि सहा महीन्याच्या आत म्हणजेच दिनांक १७ ऑगस्ट २०२१ रोजी सकाळी ११.३० वाजता या कार्यालयात वेळेत जातीने किंवा अभिकर्त्यामार्फत हजर होवून सदरहू जमिनीतील तुमच्या भरपाई संबंधीच्या दाव्याची रक्कम व तपशील आणि उक्त अधिनियमाच्या कलम २० अन्वये दाखल केलेल्या मोजणीसंबंधाने तुमच्या काही हरकती असतील तर त्या दाखल कराव्यात. दि.१३ जानेवारी २०२२ पर्यंत (शासकिय सुट्ट्याचे दिवस वगळून) सदर हरकती / सुचना दाखल करण्यास मुभा असेल. सदर प्रकरणी पुढील मुदतवाढ कोणत्याही परिस्थितीत मिळणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

**अनुसूची-एक**
**संपादित करावयाच्या जमिनीचे वर्णन**
**जिल्हा पुणे, तालुका हवेली, गाव मौजे बोपखेल.**

| अ.क्र. | सर्व्हे नंबर | संयुक्त मोजणी नकाशा व क्षेत्र विवरणपत्रा नुसार भूसंपादना खालील क्षेत्र (चौ.मी.) | TDR/FSI/खाजगी तडजोडीव्दारे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने यापूर्वीच परस्पर ताब्यात घेतलेले क्षेत्र (चौ.मी.) | भूसंपादना खालील निव्वळ क्षेत्र (चौ.मी.) | चतुसिमा: | |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | १५६ पै | ३६०० | ४४६.३६ | ३१५३.६४ | पूर्व- | सर्व्हे नं.१५६ पै उर्वरीत भाग |
| | | | | | पश्चिम- | संरक्षण विभाग सिमाभित |
| | | | | | दक्षिण- | सर्व्हे नं.१५६ पै उर्वरीत भाग |
| | | | | | उत्तर- | सर्व्हे नं.१५६ पै उर्वरीत भाग |

**अनुसूची -दोन**
**सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपाबाबत विवरण**

प्रकल्पाचे नाव:- मौजे बोपखेल, ता. हवेली, जि. पुणे येथील सर्व्हे नं.१५६ पै मधील पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेतील १८. मी. रुंद रस्ता

प्रकल्पाच्या कामाचे वर्णन:- १८.०० मी. रुंदरस्ता

समाजाला होणारा लाभ :- पायाभूत सुविधा, सोयी सुविधा (आर्थिक, रोजगार, पायाभूत सुविधा, सोयीसुविधा याबाबत व इतर लाभांसंबंधात )

प्रकल्पाखालील जागेची सद्यस्थिती:- पत्राशेड व एक बांधकाम आहे. उर्वरीत जागा मोकळी आहे.

टिप:- उक्त अनुसूचीत नमूद जमिनींचे नकाशे भूमि संपादन विशेष अधिकारी, विशेष घटक क्र.२, पिंपरी, पिंपरी - चिंचवड. महानगरपालिका, संत तुकारामनगर, श्री.शिवछत्रपती शिवाजी महाराज, गोल मंडई इमारत, दुसरा मजला, पिंपरी,पुणे-४११०१८, यांच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत पाहण्याकरिता उपलब्ध आहेत.

जा.क्र. भूसंविअ/विघ/2/पिंपरी पुणे/प्र.क्र.२६१/बोपखेल/१८ मी रस्ता/
कलम १९ अधिसुचना प्रसिध्दीकरण/
संत तुकारामनगर, मार्केट इमारत,
दुसरा मजला, पिंपरी, पुणे १८.
दुरध्वनी क्र. ०२०-२७४२०५०३.
ई-मेल-slaosu२@gmail.com

S.Kulkarni
(शुभांगी. रा. कुलकर्णी)
भूमि संपादन विशेष अधिकारी,
विशेष घटक क्र. २, पिंपरी,पुणे-४११०१८.